# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/05/2023 (मंगळवार) दुपार


---

## घरफोडी

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील राठी लेआउट काटोल येथे दिनांक ३०/०४/२०२३ चे २०.३० वा. ते २२.५० वा. दरम्यान फिर्यादी नामे– देवेन्द्र नामदेव साठोने, रा. मरामाय नगर रोड राठी लेआउट काटोल हे घराशेजारी नातेवाइकांकडे गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचे कुलूप तोडुन नगदी पैसे व चांदीचे दागिने असा एकुण ५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. देशमुख मो. क्र. ९६६५६१५२९५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील वार्ड क्र. ३ पाटणसावंगी सावनेर येथे दिनांक ०१/०५/२०२३ चे ०२.०० वा. ते ०२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– मिलींद पदमाकरजी केदार, वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. २ पाटणसावंगी ता. सावनेर यांचे काकाचे बंद घराचे लोखंडी गेट तसेच मुख्य दरवाज्याचे कुलुप तोडुन घरात प्रवेश करून घरातील सामान अस्ताव्यस्त करून घरातुन चारचाकी वाहनाची चावी घेवुन घरासमोर ठेवलेली जुनी पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर गाडी क्र. एम. एच.– ४० सि.ए– १७८४ किंमती अंदाजे ३,००,०००/–रू ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना/१९१४ रविंद्र चटप मो. नं. ८३२९७२७६११ हे करीत आहे.

## घरफोडीचा प्रयत्न

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत माताखेडी खापा येथे दिनांक ३०/०४/२०२३ ते दिनांक ०१/०५/२०२३ चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– लक्ष्मण चंपत गायधने, वय ७७ वर्ष, रा. माळीपुरा खापा हे आपले पत्नी सह बाहेरगावी आपले मुलाकडे गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे घराचा लॉक तोडुन आत प्रवेश करुन लोखंडी कपाट उघडुन चोरी करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ बोरकर मो. नं. ९८२३५८१२९७ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर